महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : १४४२/गट-क संयुक्त लि.टं/२०२३/२४ दिनांक :- १६ मे, २०२४

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय :- महाराष्ट्र गट- क सेवा (मुख्य) परीक्षा-२०२३**
**लिपिक टंकलेखक, गट-क या संवर्गाच्या टंकलेखन कौशल्य चाचणीकरीता अर्हताप्राप्त उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याबाबत.**

**संदर्भ :- जाहिरात क्रमांक - १११/२०२३**

महाराष्ट्र गट-क सेवा (मुख्य) परीक्षा-२०२३, मधील लिपिक टंकलेखक, गट-क या संवर्गाच्या टंकलेखन कौशल्य चाचणीकरिता अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२.** सदर अर्हताप्राप्त उमेदवारांची यादी ही निव्वळ टंकलेखन कौशल्य चाचणीसाठी असून उमेदवारांच्या अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूर्वी पडताळणी अंती काही उमेदवारांच्या दाव्यांमध्ये/ शिफारशीमध्ये बदल होऊ शकतो.

**३.** खेळाडूसाठी आरक्षित पदाकरिता अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची क्रीडाविषयक कागदपत्रे प्राधिकृत क्रीडा अधिका-यांनी तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून त्यांचा खेळाडू प्रवर्गाचा दावा तात्पुरता ग्राह्य धरण्यात आला असून अर्हताप्राप्त उमेदवारांच्या यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

**४.** दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त,भुकंपग्रस्त व पदवीधर अंशकालीन आरक्षणाचा दावा करणाऱ्या व अर्हताप्राप्त यादीत समावेश झालेल्या उमेदवारांना टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे अशा उमेदवारांना टंकलेखन चाचणी अनिवार्य नाही.

**५.** प्रस्तुत अर्हताप्राप्त उमेदवारांची यादी मा. न्यायालय / मा. न्यायाधिकरण येथे दाखल विविध न्यायिक प्रकरणांमधील न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात येत आहे.

**६.** प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठीच्या आवेदनपत्रात 'लिपिक टंकलेखक' संवर्गाचा विकल्प दिलेल्या व पूर्व परीक्षेतून अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांचाच शासनस्तरावर तपासणी करण्याच्या अधीन राहून सदर टंकलेखन कौशल्य चाचणीच्या निकालात समावेश करण्यात आला आहे.

**७.** टंकलेखन कौशल्य चाचणी अर्हताकारी / पात्रता (Qualifying) स्वरुपाची असून त्याबाबत उमेदवारांना आयोगाच्या https://mpsc.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्दीपत्रकाद्वारे स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

**उपसचिव (परीक्षोत्तर अराजपत्रित)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, नवी मुंबई**

**ठिकाण – नवी मुंबई**